**कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर**
**स्थायी समिती सभा क्र.१८ सन २०२३/२४**
**स्थायी समिती सभा मंगळवार, दिनांक १८/०७/२०२३**

**कार्यवृत्तांत**

कोल्हापूर जिल्हा परिषदेची स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक १८.०७.२०२३ इ.रोजी दुपारी ०१.०० वाजता मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साो,जिल्हा परिषद कोल्हापूर यांचे दालनात प्रत्यक्षात आयोजीत केली होती. सदर सभेचा कार्यवृतांत खालील प्रमाणे आहे.

येणेप्रमाणे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक, तसेच संबधीत खाते प्रमुख, अधिकारी सभेस उपस्थित झाले व सभा कामकाजास सुरवात झाली.

**सचिव :-** सर्वांना नमस्कार. कोल्हापूर जिल्हा परिषदेची प्रशासक कालावधीतील सभा आज मंगळवार दिनांक १८.०७.२०२३ इ.रोजी आयोजित केली आहे. आजच्या सभेसाठी उपस्थित असलेले जिल्हा परिषदेचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक साो, मा. प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. कोल्हापूर तसेच संबधीत खाते प्रमुख, अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करते. व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक,यांच्या मान्यतेने सभा कामकाजास सुरवात करते.

**विषय क्र.१ :-** स्थायी समिती सभा दिनांक २०/०६/२०२३ इ रोजी दुपारी १२.३० वाजता संपन्न झाली त्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे. **(सा.प्र)**

**सचिव-** सर्व खातेप्रमुखाना मागील आठवडयातच सदर सभेचा कार्यवृतांत पाठविणेत आलेला आहे. याबाबत कोणत्या विभागाची काही अडचण आहे का ?

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** कोणत्याही विभागाची सदर कार्यवृतांता बाबत काही आक्षेप नाही असे समजून कार्यवृतांत कायम करणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २४०** **दिनांक १८-०७-२०२३**

स्थायी समिती सभा दिनांक २०/०६/२०२३ इ रोजी दुपारी १२.३० वाजता संपन्न झाली होती. सदर स्थायी समिती सभेच्या इतिवृतांचे सभागृहात वाचन करणेत येवून सर्वानुमते इतिवृत्त कायम करणेबाबतचा ठराव पारीत करणेत आला.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.२ :-** सप्ताहामध्ये प्राप्त झालेल्या महत्वाचे शासन निर्णय परिपत्रके वाचन करणे.

**विषय क्र.३ :-** ग्रामपंचायत बुरुडे ता.आजरा येथील पाण्याची टाकी निर्लेखनाबाबत **(ग्रामपंचायत)**

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) :-** मौजे बुरुडे ता.आजरा येथील पाण्याची टाकी निर्लेखनाबाबतचा विषय असून याबाबत शिवाजी विदयापीठ कोल्हापूर यांचेकडून स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट व कार्यकारी अभियंता ग्रा.पा.पू. जि.प.कोल्हापूर यांचेकडून शिफारस पत्र दिलेले आहे. तरी सदर विषयास स्थायी समिती सभेची शिफारस मिळावी.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** निर्लेखनाबाबत विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर विषयास मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २४१** **दिनांक १८-०७-२०२३**

ग्रामपंचायत बुरूडे, ता. आजरा येथील पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबतचा प्रस्ताव सरपंच/ ग्रामसेवक ग्रामपंचायत बुरूडे यांचेकडून दि.२८/१२/२०२२ रोजी पंचायत समिती, आजरा यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

सदर पाण्याचा टाकीचा सातबारा उतारा व नमुना नंबर २२ प्रस्तावासोबत सादर केलेला आहे. ग्रामपंचायत बुरूडे, ता.आजरा यांनी मासिक सभा ठराव क्रं.४५ दि.२०/१०/२०२२ व ग्रामसभा ठराव क्र.३५ दि. १०/०८/२०२२ सदर टाकी सन १९८८ मध्ये बांधली असून नादुरूस्त झाली असल्यामुळे दैनंदिन वापरास घेणे अडचणीचे होत असलेने निर्लेखन करणेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. पंचायत समिती मासिक सभा ठराव क्रं.५१ दि.०२/०१/२०२३ अन्वये सदर निर्लेखनास मंजुरी दिली आहे. शिवाजी विदयापीठ कोल्हापूर यांचेकडील स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट Outward No/SU/DOT/Civil Engg /२०२३/२९९४ दि.०७/१०/२०२२ ने सादर केलेला आहे.

कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.) जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडील पत्र जा.क्र.कोजिप/ग्रापापु/ कावि-७/६४/२०२३ दि. ११/०१/२०२३ ने ग्रामपंचायत बुरूडे पाण्याची टाकी निर्लेखन करणेबाबत शिफारस पत्र दिलेले आहे. तसेच सदरच्या पाण्याच्या टाकीचे नियमानुसार निर्लेखन करणेबाबत ग्रामपंचायत मौजे बुरूडे, ता.आजरा विहित कार्यपध्दतीचा अवलंब करणार आहे.

सदरच्या निर्लेखनास ही सभा जि.प. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करीत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.४ :-** कन्या विदया मंदिर व कुमार विदया मंदिर भुयेवाडी शाळांचे एकत्रिकरण करणेबाबत. **(शिक्षण प्राथमिक)**

**प्राथमिक शिक्षण विभाग प्रतिनिधी -** कन्या विदया मंदिर व कुमार विदया मंदिर भुयेवाडी शाळांचे एकत्रिकरण करणेबाबत शिफारस मिळणेस विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २४२** **दिनांक १८-०७-२०२३**

गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती करवीर यांनी कन्या विदया मंदिर भुयेवाडी व कुमार विदया मंदिर भुयेवाडी या दोन शाळा एकत्रिकरण करणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. कन्या विदया मंदिर भुयेवाडी व कुमार विदया मंदिर भुयेवाडी अशा दोन शाळा भरत असून कन्या विदया मंदिर इयत्ता १ ली ते इयत्ता ७ वी पर्यंतचे वर्ग असून पट १३६ आहे व कुमार विदया मंदिर इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे वर्ग असून पट १४० आहे. कुमार विदया मंदिर भुयेवाडी शाळा गावापासून बाहेर व अंतर जास्त आहे. कुमार विदया मंदिर शाळेच्या काहीच अंतरावर क्रशर प्लांट आहेत. त्यामुळे त्या भागात अवजड वाहनांचे ट्रक, ट्रक्टर व इतर वाहनांची वर्दळ खूप असलेने इ.१ ली व २ री च्या मुलांना शाळेत जाणे-येणे शक्य नसलेने कन्या शाळेच्या आवारात सदरचे वर्ग भरतात व इयत्ता ३ री ते इयत्ता ७ वी चे वर्ग कुमार शाळेच्र्या इमारतीत भरतात त्यामुळे शाळेचे प्रशासन करणे व शालेय कामकाज करणे गैरसोईचे होत आहे.

मार्च २०२३ मध्ये केलेल्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट च्र्या रिपोर्ट प्राप्त झाला असून कुमार विदया मंदिर भुयेवाडी शाळेची इमारत वापरण्यात योग्य नसलेचे सदरच्या रिपोर्ट मध्ये कळविले आहे. त्यामुळे कुमार विदया मंदिर ही शाळा कन्या विदया मंदिर शाळेत वर्ग करुन एकत्रित भरविणे आवश्यक

असलेने कुमार विदया मंदिर भुयेवाडी शाळेची इमारत १९६६ ची आहे तरी सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षापासून मौजे भुयेवाडी ता.करवीर येथील कन्या विदया मंदिर व कुमार विदया मंदिर शाळांचे एकत्रिकरण व्हावे या बाबतचा प्रस्ताव गटशिक्षणाधिकारी यांचे शिफारशीसह सादर केला आहे. सदर विषयाबाबत शिक्षण समिती सभेत सविस्तर चर्चा करणेत आली.

त्यानुसार कन्या विदया मंदिर भुयेवाडी व कुमार विदया भुयेवाडी या शाळा एकत्रिकारण करणेसाठी शिक्षण समितीमध्ये चर्चा होऊन सदर विषयास शिक्षण समितीने ठराव क्रमांक ८९ दिनांक २३/०६/२०२३ अन्वये मंजूरी दिलेली आहे. तसेच स्थायी समिती सभेमध्ये ही चर्चा करणेत आली व कन्या विदया मंदिर भुयेवाडी व कुमार विदया भुयेवाडी या शाळा एकत्रिकरण करणेसाठी मान्यता देण्यात आली व सदरचा विषय जि.प.सर्वसाधारण सभेचे मान्यता घेणेकामी शिफारस करण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.५** :- जिल्हा परिषद कोल्हापूर येथील मुख्य प्रशासकीय इमारत आवारामध्ये नविन व वाढीव प्रस्तावित बांधकामाचे महानगर पालिकेचे नियमाप्रमाणे नकाशे तयार करणेसाठी नियुक्त करणेत आलेल्या वास्तुविशारद यांची नेमणूक करणेत आलेली असलेने त्यांचे देयकाची रक्कम आदा करणेस मान्यता देणे बाबत **(बांधकाम)**

**कार्यकारी अभियंता (बांधकाम) :-** वास्तुविशारद यांची नेमणूक करणेत आलेली असलेने त्यांचे देयकाची रक्कम आदा करणेस मान्यता देणे विषयी विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** पूर्ण रक्कम परत करु नये.

**कार्यकारी अभियंता (बांधकाम) :-** आपण त्यांना ७५ टक्के रक्कम देत आहोत.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक -२४३** **दिनांक १८-०७-२०२३**

जिल्हा परिषद कोल्हापूर येथील प्रशासकिय इमारत आवरामध्ये नवीन व वाढीव प्रस्तावित बांधकामाचे महानगर पालिकेचे नियमाप्रमाणे नकाशे तयार करणेसाठी मे.मानसी इंजनिअर्स अर्कीक्टेट अँन्ड इंजनिअर्स, कोल्हापूर यांची वास्तुविशारद म्हणून नियुक्ती करणेत आलेली होती. त्यासाठी त्यांचे नावे रक्कम रु.७०८००/- इतक्या रक्कमेचे दरपत्रक मंजूर करणेत आलेले आहे.

सदयस्थित संबंधीत फर्म कडून कोटेशनमध्ये नमूद केलेप्रमाणे काम केलेले असून कामाचे अंतिम प्रमाणपत्र देणेचे असलेने कोटेशन नोटीस मधील शर्ती व अटी नुसार एकूण निविदा रक्कम रु.७०८००/- रक्कमेच्या ७५% रक्कमेचे देयक रु.५३१००/- देयक संबंधीतांनी आदा करणेसाठी सादर केले आहे.

सदरचा खर्च हा ११ ब - संकीर्ण ठेवी या लेखाशिर्षाखाली जमा ठेव रक्कम रु.८०,९०,७३६/- मधून असलेल्या शिल्लक रक्कमेमधून करणेत येणार आहे. तथापी सदरची रक्कम ही ३ वर्षावरील असलेमुळे महसुली जमा घेणेत आलेली रक्कम परत करावयाची झालेस महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६८ मधील नियम २१९ अन्वये स्थायी समितीची मान्यता घेवून पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यासाठी व्यपगत महसुली परतावा करणेचे अधिकार स्थायी समितीला असलेने रक्कम रु.५३१००/- मे.मानसी इंजनिअर्स अर्कीक्टेट अँन्ड इंजनिअर्स, कोल्हापूर यांना आदा करणेस बांधकाम समिती सभा दि.३०/०६/२०२३ नुसार स्थायी समितीच्या मान्यतेने रक्कम आदा करणेस शिफारस

करणेत आलेली आहे. त्यानुसार ही स्थायी समिती रक्कम रु.५३१००/- मे.मानसी इंजनिअर्स अर्कीक्टेट अँन्ड इंजनिअर्स, कोल्हापूर यांना आदा करणेस मान्यता देत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.६ :-** मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना अंतर्गत कृषी वाहिनीचे सौर उर्जाकरण प्रकल्प उभारणेसाठी शासकिय/ग्रामपंचायत जागा उपलब्ध करुन देणेबाबत. **(ग्रामपंचायत)**

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) :-** मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना अंतर्गत कृषी वाहिनीचे सौर उर्जाकरण प्रकल्प उभारणेसाठी शासकिय/ग्रामपंचायत जागा उपलब्ध करुन देणेबाबत विषयास शिफारस मिळणेस विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २४४** **दिनांक १८-०७-२०२३**

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना अंतर्गत कृषी वाहिनीचे सौर उर्जाकरण प्रकल्प उभारणेसाठी शासकिय/ग्रामपंचायत जागा उपलब्ध करुन देणेबाबत निवासी उपजिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडून क्र.कार्यासन-३ ई/जमीन/आर.आर/१९३/२०२३ दि.३०/०१/२०२३ अन्वये खालील १२ तालुक्यातील १२ ग्रामपंचायतीकडून ग्रामसभा ठराव प्रस्तावास शिफारस मिळणे बाबत कळविणेत आले आहे.

| अ. क्र. | तालुक्याचे नाव | महावितरण केंद्र | गावाचे नाव | ग्रामसभा ठराव क्र.व दिनांक | जमीन मागणी गट नं. नकार दिले |
|---|---|---|---|---|---|
| १ | राधानगरी | | मल्लेवाडी | ठराव क्र.०५ दि.२६/०१/२३ | गायरान ग.नं.७२/१ नकार |
| २ | गडहिंग्लज | | तावरेवाडी | ठराव क्र.१७ दि.७/२/२३ | नकार |
| ३ | | | हनिमनाळ | ठराव क्र.४७/१ दि.२६/१/२३ | गायरान गट नं.४६५/१ नकार |
| ४ | भुदरगड | | तिरवडे-कुडतरवाडी | ठराव क्र.७ दि.२६/१/२३ | गायरान गट नं.५९२ नकार |
| ५ | | | अनफ खु | ठराव क्र.२/१ दि.३/२/२३ | गायरान गट नं.८८ नकार |
| ६ | शाहूवाडी | | थावडे | ठराव क्र.१२ दि.२६/१/२३ | गायरान गट नं.७८७ नकार |
| ७ | शिरोळ | | घोसरवाड | ठराव क्र.२९ दि.२६/१/२३ | गायरान गट नं.७/१ व ११६८ |
| ८ | | | कोथळी | ठराव क्र.३२/१ दि.३/२/२३ | गायरान गट नं.१२२७ न्यायप्रविष्ठ व १२१३ देणेस नकार |
| ९ | चंदगड | | पार्ले | ठराव क्र.०७ दि.६/२/२३ | नकार |
| १० | पन्हाळा | | पडळ | ठराव क्र.३२ दि.८/२/२३ | नकार |
| ११ | गडहिंग्लज | | अत्याळ | ठराव क्र.१४ दि.२६/१/२३ | नकार |
| १२ | शिरोळ | | तमदलगे | ठराव क्र.५५ दि.३१/१/२३ | नकार |

वरील सर्व ग्रामपंचायतींनी नकार कळविलेला असला तरीही अपवादात्मक बाब म्हणून केंद्र / राज्य शासनांच्या उपक्रमांना जागा उपलब्ध करुन देणे सार्वजनिक हितार्थ आवश्यक असल्याने जिल्हाधिकारी

कार्यालयाकडून प्राप्त झालेले प्रस्तावानुसार गायरान जमीन अपवादात्मक बाब म्हणून सदर प्रकल्पाकरीता जागा आवश्यक असलेने सदरचे विषयास स्थायी समिती सभा शिफारस करीता आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**विषय क्र.७ :-** महसुलात जमा करण्यात आलेली सुरक्षा अनामत ठेवीची रक्कम मागणी केल्यामुळे परत करण्याबाबत (बांधकाम)

**कार्यकारी अभियंता (बांधकाम) :-** महसुलात जमा करण्यात आलेली सुरक्षा अनामत ठेवीची रक्कम मागणी केल्यामुळे परत करण्यास विनंती आहे.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ताबा मिळाला आहे का? कोणाची काही तक्रार आली आहे का? कागदपत्रांची पुर्तता असल्यास अनामत रक्कम परत करावी.

**कार्यकारी अभियंता (बांधकाम) :-** अनामत रक्कम परत करावयाच्या प्रकरणांमध्ये सर्व ठिकाणी ताबा मिळाला आहे, कोठेही तक्रार अथवा कागदपत्रां अभावी प्रकरण प्रलंबित नाही.

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** ठिक आहे, मान्यता देणेत येत आहे.

**ठराव क्रमांक - २४५** **दिनांक १८-०७-२०२३**

खाली नमूद कामांची व्यपगत अनामत रक्कम मक्तेदार यांनी मागणी केली असून त्या संबंधीची तसेच प्रस्तुत रक्कम महसुल खाती जमा केली असेलबाबत खातरजमा केली आहे.त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | कामाचे नाव | ठेकेदार | अनामत रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मौ.कावणे ता.करवीर येथे कंपौड वॉल बांधणे | श्री.अभिजीत बापूसो किल्लेदार | १८०३०/- | |
| २. | मौ.शिप्पुर तर्फ आजरा ता.गडहिंग्लज येथे सांस्कृतीक हॉल बांधणे ग्रा.प.मि.क्र.३८९ | श्री संजय महादेव कुंभार | ४७९४०/- | |
| ३. | मौ.गुडाळ ता.राधानगरी येथील अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे | श्री.अजिंक्य पांडुरंग हुजरे | ४९९९८/- | |
| ४. | मौ.यड्राव ते इजिमा ४४ रस्ता ग्रामा क्र १७८ सुधारणा करणे किमी ०/०० ते १/३०० ता.शिरोळ | मे ओंकार कन्ट्रक्शन प्रोप्रा सचिन महादेव कोळी | २१२७३६/- | |
| ५. | कोल्हापूर जिल्हयातील दत्तवाड ते माने पाणवठा रस्त ग्रामा क्र.४४ सुधारणा करणे | श्री.रामचंद्र सखाराम बंडगर | १७०६००/- | |

वरील कामांची रक्कम ही तीन वर्षाखालील हक्क न सांगितलेल्या प्रलंबित ठेवी या सदराखाली राहिल्याने महाराष्ट्र जि.प.व पं.स. लेखासंहिता १९६८ मधील नियम २०९ (७) तीन नुसार व्यपगत ठेवी म्हणून जिल्हा परिषद जमा खाती घेतली आहे.वरील मक्तेदार यांचा या रक्कमेवर हक्क असनु महा.जि.प.व पं.स.लेखासंहिता नियम १९६८ मधील नियम २०९ (८) नुसार स्थायी समितीच्या पुर्व मान्यतेने त्यांना रक्कम आदा करता येते.

सदरचा प्रस्ताव अवलोकनी येऊन सर्व कामांचे कामपूर्णत्वाचे दाखले असलेची व कामाविषयी तक्रार नसलेची खात्री करुन संबंधीत मक्तेदारांना अनामत रक्कम आदा करणेस स्थायी समितीची मंजूरी देणेत येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी तथा
प्रशासक
जिल्हा परिषद कोल्हापूर

**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक :-** आणखीन कोणत्या विभागाकडील विषय असलेस घ्यावेत विषय नसलेस सभा थांबवूया.

**सचिवः-** मा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक सो यांचे परवानगीने सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपन्न झाली.

**कार्यवृत्तांत वाचला आणि कायम केला.**

**(मनीषा ए देसाई)**
**सचिव तथा**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

**(संजयसिंह चव्हाण)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**प्रशासक**
**जिल्हा परिषद,कोल्हापूर**